**महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ**
(स्वायत्त) (ISO 9001:2008) (ISO/IEC 27001:2005)
४ था मजला, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दू.क्र. : २६४७५०७७/२६४७७२०९ फॅक्स : ९१-०२२-२६४७३९८०
ई-मेल : secretary@msbte.com संकेत स्थळ : www.msbte.com

जा.क्र.मरातंशिमं/का-४०/नोंदणी/२०१७/२११ दिनांक - 24 AUG 2017

# परिपत्रक

**विषय:** शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी विद्यार्थ्यांचे Enrollment व परिक्षा अर्जाचे वेळापत्रक
संदर्भ: Academic Calender वर्ष २०१७-१८ - MSBTE/D-40/Academic Calender/B2/2017/5834
दि. ०४/०५/२०१७

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांचे नोंदणी अर्ज व परिक्षा अर्ज तसेच O/N/R/S/A Scheme (Yearly Pattern) मधील विद्यार्थ्यांसाठी परिक्षा अर्ज भरण्याकरिता वेळापत्रक:

| अनु. क्र. | प्रक्रिया | कालावधी |
|---|---|---|
| १ | संस्थास्तरावर नोंदणी निश्चित करून परिक्षा अर्ज भरणे ( नियमित शुल्कासह) | दि. ०६/०९/२०१७ ते १४/०९/२०१७ पर्यंत |
| २ | परिक्षा अर्ज भरणे ( नियमित शुल्क + रु. २००/- दंडासह) | दि. १५/०९/२०१७ ते दि. १८/०९/२०१७ |
| ३ | परिक्षा अर्ज भरणे ( नियमित शुल्क + रु. १५००/- दंडासह) | दि. १९/०९/२०१७ ते दि. २१/०९/२०१७ |
| ४ | विभागीय कार्यालय स्तरावर नोंदणी अर्ज व परिक्षा अर्ज निश्चिती | दि. २२/०९/२०१७ पर्यंत |
| ५ | दि. १९/०९/२०१७ ते दि. २१/०९/२०१७ पर्यंत संस्थास्तरावरील रु. १५००/- दंडासह निश्चित केलेल्या परिक्षा अर्जांचीच विभागीय कार्यालयात निश्चिती | दि. २५/०९/२०१७ सायं. ५ वाजेपर्यंत |

**नोंदणी प्रक्रियेत खालील महत्वाचे बदल करण्यात आले आहेत:**

१) **प्रथम नोंदणीकृत विद्यार्थ्यांचे नोंदणी अर्ज संस्थास्तरावर निश्चित (Confirm) केल्यानंतर लगेचच विद्यार्थ्यांचे परिक्षा अर्ज उपलब्ध करून देण्यात येतील. पुढील कार्यवाही करीता एकत्रित नोंदणी अर्ज व परिक्षा अर्ज आवश्यक शुल्कासह निश्चितीकरीता विभागीय कार्यालयात सादर करण्यात यावेत.**

२) AICTE अभ्यासक्रमासाठी DTE Portal वर अपलोड केलेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांनाच नोंदणी करता येईल.

३) NON AICTE ( MSBTE approved Short Term Courses) अभ्यासक्रमासाठीची नोंदणी व गुणवत्ता यादी मागील वर्षाप्रमाणे विभागीय कार्यालयामार्फत तपासणी करूनच नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.

४) नोंदणीकृत विद्यार्थ्यांची संस्थानिहाय व अभ्यासक्रमनिहाय अधिकतम प्रवेशक्षमतेपर्यंत मर्यादित राहील. अधिकतम क्षमतेवरील विद्यार्थ्यांच्या नोंदणीसाठी त्याच्या विशिष्ट प्रवर्गासाठी संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय यांच्या परवानगीचे पत्र आवश्यक राहील.

५) एका विद्यार्थ्याचे नोंदणी प्रक्रियेत एकदाच नामांकन करता येईल. एकाच विद्यार्थ्याचे त्याच अथवा इतर संस्थेत नोंदणी झाल्याचे आढळल्यास त्याची जबाबदारी संस्थाप्रमुख यांची राहील.

६) DTE स्तरावरील प्रवेशित संस्था व अभ्यासक्रमातच नोंदणी करणे अनिवार्य आहे.संस्था अथवा अभ्यासक्रम बदलल्याचे आढळल्यास त्याची जबाबदारी संस्थाप्रमुखांवर राहील.

७) शाखाबदल किंवा संस्थाबदल विद्यार्थ्यांबाबत तंत्रनिकेतनातील प्रवेशाबाबतच्या माहिती पुस्तिकेतील (Information Broucher for Admission to Full Time Professional Diploma Technical Courses Year 2017-18, State CET Cell, Maharashtra State, Mumbai) पान क्र. २९ वरील क्र. १६ नुसार परिक्षा अर्ज स्विकृतीबाबत कार्यवाही करण्यात येईल.

८) ऑनलाईन प्रक्रियेत विद्यार्थ्यांची नोंदणी (Enrollment) हा महत्त्वाचा टप्पा असून सदर प्रक्रिया अचूकतेने करण्यात यावी. विशेषतः विद्यार्थ्यांचे नाव हे शालांत परीक्षेच्या प्रमाणपत्राप्रमाणेच असणे आवश्यक आहे. फोटोसह स्वाक्षरी असलेली अचूक इमेज अपलोड करणे बंधनकारक आहे. केंद्रिय प्रवेश प्रक्रियेतून प्राप्त फोटोसह स्वाक्षरी असलेली इमेज चांगल्या प्रतीची नसल्यास त्याऐवजी नवीन स्कॅन केलेली फोटोसह स्वाक्षरी असलेली इमेज अपलोड करण्यात यावी. नोंदणी प्रक्रियेनंतर इमेज (फोटोसह स्वाक्षरी) बदलासाठी मंडळाकडे अर्ज केल्यास रु. ५००/- दंड आकारुनच नोंदणी झालेल्या विद्यार्थाचे फोटोसह स्वाक्षरी मध्ये बदल करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

९) विहीत मुदतीतील सर्व अर्ज कन्फर्म केल्यानंतर अथवा संस्थेमार्फत रु. १५००/- दंड आकारून स्विकारलेला शेवटचा परिक्षा अर्ज विभागीय कार्यालयात कन्फर्म करताना संस्थाप्रमुखांना सोबत जोडलेले हमीपत्र देणे बंधनकारक राहील.

फॉर्म भरण्याच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच दि. २५/०९/२०१७ रोजी विद्यार्थी, संस्था व विभागीय कार्यालय यांच्यामार्फत कन्फर्म झालेले परीक्षा अर्जच हिवाळी परिक्षा-२०१७ करीता ग्राह्य धरण्यात येतील. उपरोक्त विहीत केलेल्या मुदतीनंतर म्हणजेच दि. २५/०९/२०१७ नंतर हिवाळी परिक्षा-२०१७ साठी परीक्षा अर्ज स्विकारण्याची मुदतवाढ देण्यात येणार नाही.

नोंदणी प्रक्रीयेतील कोणतीही अडचण सोडविण्यासाठी संस्थेच्या लॉगिन मधील मेसेज सिस्टीम मधूनच MSBTE Support शी संपर्क साधण्यात यावा.

(डॉ. विनोद म. मोहितकर)
सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई.

प्रत –

१) मा.संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई-५१ यांना माहितीस्तव सादर.
२) प्राचार्य, म. रा.तंत्रशिक्षण मंडळाशी संलग्न असलेल्या सर्व संस्था
३) उपसचिव, म. रा.तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नागपूर आणि औरंगाबाद